म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........................
दा. क्र. 3092

# एकात्मता स्तोत्र-मंत्र आणि प्रार्थना

BVBK-0403019

भारतीय विचार साधना, पुणे प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
यांनी देणगी दिलेले पुस्तक
बा.वा.
६ ३०९९
२४।७०।९८

# एकात्मता स्तोत्र-मंत्र

आणि

# प्रार्थना

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
बाल वाङ्मय विभाग.
अ. क्र. ३०९९ दिनांक २४।७०।९८
विषय बा.वा. क्र. ........

*

BVBK-0403019

भारतीय विचार साधना, पुणे; प्रकाशन

प्रकाशक :

**ब. शं. दाते,**

भारतीय विचार साधना, पुणे

१८४७ सदाशिव पेठ, पुणे ३०.

✡

**प्रथमावृत्ती :**

अधिक श्रावण शुद्ध ४।।, शके १९०७

(दिनांक २१-७-१९८५)

✡

मूद्रक :

**का. गं. सोनार,**

लोकसंग्रह मुद्रणालय,

१७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# एकात्मतास्तोत्र–मंत्र आणि प्रार्थना

## एकात्मतास्त्रोत्रासंबंधी थोडेसे

भारताची सनातन आणि सर्वंकष एकात्मता यांचे प्रतीकस्वरूप नावांचा समावेश असलेले हे **एकात्मता–स्तोत्र** आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या वर्षीच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेने या स्तोत्राला अनुमती दिली आहे. जनमानसावरील भारताच्या एकात्मतेचा संस्कार दृढमूल करतील, अशा प्रातिनिधिक नावांचा या स्तोत्रात समावेश आहे.

आपल्याकडे प्रात:स्मरण म्हणण्याची पद्धती पुरातन आहे. स्व. बाबासाहेब आपटे यांना तीपासून प्रेरणा मिळाली आणि परंपरागत प्रात:स्मरणात काही सुधारणा व थोडी भर घालून ४५ श्लोकांचे प्रात:स्मरण तयार करण्यात आले व त्याचा प्रसार करण्यात आला. सुमारे २५ वर्षानंतर या प्रात:-स्मरणाची सुधारित दुसरी आवृत्ती प्रसारित झाली. तीमध्ये ३० श्लोक होते. त्यामधील 'प्रभाते करदर्शनम्' किंवा 'प्रात:स्मरणमेतद्यो' हे शब्द प्रभात-कालाशी निगडित असल्याने सायम् शाखा, रात्र शाखा अथवा अन्य वेळी भरणाऱ्या शाखा यामध्ये ते स्तोत्र म्हणताना काहीसे चमत्कारिक वाटे आणि ते स्वाभाविकही होते. आता हे एकात्मता–स्तोत्र सार्वकालिक असल्यामुळे दिवसा वा रात्री कोणत्याही वेळी म्हणण्याला काही संकोच वाटणार नाही.

नव्या एकात्मता–स्तोत्रात पूर्वीची ११ नावे गाळली आहेत. (सनत्कुमार, सनक, सनन्दन, सनातन, आसुरि, पिंगल, हैहय अर्जुन, नल, अश्वत्थामा, बिभीषण, कृपाचार्य), तसेच काहींचा उल्लेख समुच्चयवाचक शब्दांनी (Clubbing together) केला आहे. उदाहरणार्थ -

१ ब्रह्मा, मुरारि, त्रिपुरान्तकारि, लक्ष्मी, सरस्वती, गोविन्द यांऐवजी 'सच्चिदानन्द परमात्मा'

२. भानु, शशि, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहू, केतू इत्यादींच्या जागी 'ग्रहाः'.

३. पृथ्वी, आप, तेज, वायू, नभ यांसाठी ' पंचभूतानि '

स्तोत्रामधील ३३ श्लोकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे :–

श्लोक (१–२) मंगलाचरण (३) भारतमातेला वंदन (४) पर्वत (५) नद्या (६–७) प्रख्यात नगरे (८–९) ग्रंथसंपदा (१०–११) मातृदेवता (१२ ते १४) पौराणिक महापुरुष (१५ ते २१) संत, महात्मा, संप्रदाय-प्रवर्तक, साहित्य-संगीत कलोपासक (२२–२५) विख्यात वीर (२६–२७) वैज्ञानिक (२८–३१) आधुनिक महापुरुष (३२) अनुक्त महापुरुष (३३) फलश्रुती.

पूर्वीच्या प्रात:स्मरणात अनेक नावांच्या समवेत त्यांची गुणवत्ता दाखविणारी अन्वर्थक विशेषणे होती. त्यांतील बहुतेक सर्व विशेषणे काढल्यामुळे एवढी नवी नावे अंतर्भूत करूनही केवळ तीन श्लोकांची वाढ झाली आहे. या कारणामुळे श्लोकरचनेतील काव्यात्मकता नाहीशी झाल्यासारखी वाटेल, परंतु स्तोत्रांतील प्रत्येक नाव अनेक उत्तमोत्तम सद्‌गुणांचे मूर्तस्वरूपच असल्याने केवळ त्या नामोच्चारानेही अंत:करणात राष्ट्रभक्ती, एकात्मता व स्वाभिमान जागृत होतो. 'एकात्मता–स्तोत्राची' काव्यात्मकता तीच होय !

आपल्या या विशाल व अतिप्राचीन देशात असंख्य नररत्ने निर्माण झाली आहेत. त्या सर्वांचा समावेश स्तोत्रात करणे केवळ अशक्य ! म्हणून त्यातील नावे प्रतीकात्मक मानावीत. काही श्रद्धेय श्रेष्ठ पुरुषांच्या नावांचा स्तोत्रात उल्लेख नाही. कारण त्यांचा समावेश त्या परंपरेतील इतर नावांमध्ये गृहीत आहे. काही नावे अनोळखी वाटतील, पण विशिष्ट प्रांतातील त्यांचे महत्त्व जाणून ती अंतर्भूत केली आहेत. सर्व प्रांत व संप्रदाय यांच्या श्रेष्ठ पुरुषांचे प्रतिनिधित्व व्हावे, या दृष्टीने श्लोकांची रचना केली आहे.

●

३०९१

# एकात्मतास्तोत्रम्

ॐ नमः सच्चिदानन्दरूपाय परमात्मने ।
ज्योतिर्मयस्वरूपाय विश्वमाङ्गल्यमूर्तये ॥ १ ॥

प्रकृतिः पञ्च भूतानि ग्रहा लोकाः स्वरास्तथा ।
दिशः कालश्च सर्वेषां सदा कुर्वन्तु मङ्गलम् ॥ २ ॥

रत्नाकराधौतपदां हिमालयकिरीटिनीम् ।
ब्रह्मराजर्षिरत्नाढ्यां वन्दे भारतमातरम् ॥ ३ ॥

महेन्द्रो मलयः सह्यो देवतात्मा हिमालयः ।
ध्येयो रैवतको विन्ध्यो गिरिश्चारावलिस्तथा ॥ ४ ॥

गङ्गा सरस्वती सिन्धुर्ब्रह्मपुत्रश्च गण्डकी ।
कावेरी यमुना रेवा कृष्णा गोदा महानदी ॥ ५ ॥

अयोध्या मथुरा माया काशी काञ्ची अवन्तिका ।
द्वारावती च वैशाली सोमनाथ पुरी गया ॥ ६ ॥

प्रयागं पाटलीपुत्रं विजयानगरं महत् ।
इन्द्रप्रस्थं पुरं ध्येयं ख्याता तक्षशिला तथा ॥ ७ ॥

चतुर्वेदाः पुराणानि सर्वोपनिषदस्तथा ।
रामायणं भारतं च गीता सद्दर्शनानि च ॥ ८ ॥

जैनागमास्त्रिपिटका गुरुग्रन्थः सतां गिरः ।
एष ज्ञाननिधिः श्रेष्ठः श्रद्धेयो हृदि सर्वदा ॥ ९ ॥

अरुन्धत्यनसूया च सावित्री जानकी सती ।
द्रौपदी कण्णगी गार्गी मीरा दुर्गावती तथा ॥ १० ॥

लक्ष्मीरहल्या चन्नम्मा रुद्रमाम्बा सुविक्रमा ।
निवेदिता सारदा च प्रणम्या मातृदेवताः ॥ ११ ॥

श्रीरामो भरतः कृष्णो भीष्मो धर्मस्तथार्जुनः ।
मार्कण्डेयो हरिश्चन्द्रः प्रह्लादो नारदो ध्रुवः ॥ १२ ॥

हनुमाञ्जनको व्यासो वसिष्ठश्च शुको बलिः ।
दधीचिविश्वकर्माणौ पृथुवाल्मीकिभार्गवाः ।। १३ ।।

भगीरथश्चैकलव्यो मनुर्धन्वन्तरिस्तथा ।
शिबिश्च रन्तिदेवश्च पुराणोद्गीतकीर्तयः ।। १४ ।।

बुद्धा जिनेन्द्रा गोरक्षः पाणिनिश्च पतञ्जलिः ।
शङ्करो मध्वनिम्बार्कौ श्रीरामानुजवल्लभौ ।। १५ ।।

झूलेलालोऽथ चैतन्यः तिरुवल्लुवरस्तथा ।
नायन्मारालवाराश्च कम्बश्च बसवेश्वरः ।। १६ ।।

देवलो रविदासश्च कबीरो गुरुनानकः ।
नरसिस्तुलसीदासो दशमेशो दृढव्रतः ।। १७ ।।

श्रीमत्शङ्करदेवश्च बन्धू सायणमाधवौ ।
ज्ञानेश्वरस्तुकारामो रामदासः पुरन्दरः ।। १८ ।।

बिरसा सहजानन्दो रामानन्दस्तथा महान् ।
वितरन्तु सदैवैते दैवीं सद्गुणसम्पदम् ।। १९ ।।

भरतर्षिः कालिदासः श्रीभोजो जकणस्तथा ।
सूरदासस्त्यागराजो रसखानश्च सत्कविः ।। २० ।।

रविवर्माभातखण्डे भाग्यचन्द्रः स भूपतिः ।
कलावन्तश्च विख्याताः स्मरणीया निरन्तरम् ।। २१ ।।

अगस्त्यः कम्बुकौण्डिन्यौ राजेन्द्रश्चोलवंशजः ।
अशोकः पुष्यमित्रश्च खारवेलः सुनीतिमान् ।। २२ ।।

चाणक्यचन्द्रगुप्तौ च विक्रमः शालिवाहनः ।
समुद्रगुप्तः श्रीहर्षः शैलेन्द्रो बप्परावलः ।। २३ ।।

लाचिद् भास्करवर्मा च यशोधर्मा च हूणजित् ।
श्रीकृष्णदेवरायश्च ललितादित्य उद्बलः ।। २४ ।।

मसुनूरिनायकौ तौ प्रतापः शिवभूपतिः ।
रणजित्सिंह इत्येते वीरा विख्यातविक्रमाः ।। २५ ।।

वैज्ञानिकाश्च कपिलः कणादः सुश्रुतस्तथा ।
चरको भास्कराचार्यो वराहमिहिरः सुधीः ।। २६ ।।

नागार्जुनो भरद्‌वाज आर्यभट्टो वसुर्बुधः ।
ध्येयो वेङ्कटरामश्च विज्ञा रामानुजादयः ।। २७ ।।

रामकृष्णो दयानन्दो रवीन्द्रो राममोहनः ।
रामतीर्थोऽरविन्दश्च विवेकानन्द उद्यशाः ।। २८ ।।

दादाभाई गोपबन्धुः तिलको गान्धिरादृताः ।
रमणो मालवीयश्च श्रीसुब्रह्मण्यभारती ।। २९ ।।

सुभाषः प्रणवानन्दः क्रान्तिवीरो विनायकः ।
ठक्करो भीमरावश्च फुले नारायणो गुरुः ।। ३० ।।

सङ्घशक्तिप्रणेतारौ केशवो माधवस्तथा ।
स्मरणीयाः सदैवैते नवचैतन्यदायकाः ।। ३१ ।।

अनुक्ता ये भक्ताः प्रभुचरणसंसक्तहृदयाः ।
अविज्ञाता वीरा अधिसमरमुद्‌ध्वस्तरिपवः ।
समाजोद्धर्तारः सुहितकरविज्ञाननिपुणाः
नमस्तेभ्यो भूयात् सकलसुजनेभ्यः प्रतिदिनम् ।। ३२ ।।

इदमेकात्मतास्तोत्रं श्रद्धया यः सदा पठेत् ।
स राष्ट्रधर्मनिष्ठावान् अखण्डं भारतं स्मरेत् ।। ३३ ।।

।। भारत माताकी जय ।।

## स्तोत्रांतील नावांचे स्पष्टीकरण

[ २ ] **प्रकृती** – सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी युक्त असलेली ही प्रकृती सृष्टिनिर्मितीचे निमित्त असल्याचे दार्शनिकांनी म्हटले आहे. **पंचभूत**– पृथ्वी, आप (पाणी), तेज (अग्नी), वायू आणि आकाश. पृथ्वीचे उपादान कारण. **ग्रह**–नऊ ग्रह (सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी, राहू व केतू) **लोक**–स्वर्ग, मृत्यू व पाताळ अथवा सात ऊर्ध्व लोक (भूः, भुवः, स्वः, महः,

जन., तपः, सत्यम्) अधिक सप्त-पाताळ (अतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल, पाताल) मिळून चौदा भुवने. (ऊर्ध्व लोक म्हणजे स्वर्ग आणि पाताळ यामध्ये आपली पृथ्वी आहे). **स्वर**–७ मूळ (कोमल) स्वर (सा, रे, ग, म, प, ध, नी). अधिक ५ विकृति–स्वर (तीव्र) (रे, ग, म, ध, नी, मिळून १२ स्वर). **दिशा**–दहा दिशा. (मुख्य ४ : पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर; उपदिशा ४: आग्नेय, नैऋत्य, वायव्य, ईशान्य; याशिवाय ऊर्ध्व [वर] आणि अध [खाली] या दोन). **काळ**–भूत, वर्तमान आणि भविष्य अथवा सकाळ – संध्याकाळ इत्यादींनी व्यक्त केला जाणारा अखंड, अनादी, अनंत काळ.

**विशिष्ट पर्वत –**

[ ४ ] **महेंद्र** (ओरिसा), **मलय** (दक्षिण भारत), **सह्याद्री** (महाराष्ट्र), **हिमालय** (उत्तर भारत), **रैवतक** (काठेवाड – प्रचलित नाव गिरनार), **विंध्याचल** (मध्य भारत), **अरवली** (राजस्थान).

**पवित्र नद्या –**

[ ५ ] **गंगा, सरस्वती**–प्रयाग येथील गंगा–यमुना यांच्या संगमाला मिळणारी (गुप्त) नदी. **सिंधू, ब्रह्मपुत्र, गंडकी**–नेपाळमध्ये उगम. भारतात येऊन गंगेला मिळते. हिच्या प्रवाहात शाळिग्राम सापडतात. **कावेरी, यमुना, रेवा** (नर्मदा), **कृष्णा, गोदावरी, महानदी.**

**प्रख्यात पुण्यनगरे –**

[ ६ ] **अयोध्या, मथुरा, माया** (हरिद्वार), **काशी, कांची**–(कांजी-वरम्) **अवंतिका** (उज्जयिनी), **द्वारावती** (द्वारका), **वैशाली** (पुराणात वर्णिलेली, विशाल नावाच्या राजाने वसविलेली. रामायण व बौद्ध ग्रंथात उल्लेख), **सोमनाथ, जगन्नाथपुरी, गया.**

[ ७ ] **प्रयाग, पाटलीपुत्र**–पाटणा, **विजयानगर**–दक्षिण भारतातील १४ व्या शतकातील साम्राज्याची राजधानी. **इंद्रप्रस्थ**–पांडवांची राजधानी, **तक्षशिला**–वायव्य सरहद्द प्रांतातील ( हल्ली पाकितान ) प्राचीन विश्व-विद्यालयाचे स्थान.

**पवित्र ग्रंथसंपदा –**

[ ८] **चार वेद** – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद. **पुराणे**–

१८ पुराणे. **उपनिषदे** तसेच **रामायण, महाभारत, श्रीमद्भगवद्गीता. सद्दर्शने** (**न्यायदर्शन**–गौतम, **वैशेषिक**–कणाद, **सांख्य**–कपिल, **योग**–पतंजली, **मीमांसा**–जैमिनी, **वेदान्त**– व्यास. यावरोवरच **जैन**–तीर्थंकर, **बौद्ध**–बुद्ध इत्यादी सर्व दर्शने).

[ ९ ] **जैनागम**–(जैन संप्रदायातील प्रमाणभूत संहिता) **त्रिपिटक**–(बौद्ध मताचे प्रमाणभूत ३ पिटक (भाग) विनय पिटक, सुत्त पिटक, अभिधम्म पिटक), **गुरुग्रंथ**–ग्रंथसाहेव, **सतां गिरः** – अन्य सर्वभाषीय–संत साहित्य.

**वंदनीय मातृदेवता –**

[ १० ] **अरुंधती** (वसिष्ठ ऋषींची पत्नी), **अनसूया** (अत्री ऋषींची पत्नी–दत्तात्रेयांची,माता), **सावित्री** (सत्यवानाची पत्नी), **जानकी** (श्रीरामाची सहधर्मचारिणी), **सती** (दक्ष राजाची कन्या–शंकराची पत्नी), **द्रौपदी** – (पांडव–पत्नी), **कण्णगी** – (तामिळनाडूची प्रसिद्ध पतिव्रता स्त्री), **गार्गी**– (उपनिषत्कालीन ब्रह्मवादिनी–ऋषी याज्ञवल्क्यांची पत्नी), **मीरा** – (संत मीराबाई). **दुर्गावती** (मोंगलांच्या आक्रमणाला रोखणारी विंध्यवासिनी राणी)

[ ११ ] **लक्ष्मी**–(झांशीची राणी), **अहल्यादेवी होळकर**, **चन्नम्मा**– (कर्नाटकातील कित्तूरची राणी, याच नावाची दुसरी केदळीची राणी – राजाराम महाराजांना संरक्षण देणारी), **रुद्रमाम्बा** (वाराव्या शतकाच्या उत्तरार्धात आंध्र प्रांतातील काकतीय साम्राज्याली प्रसिद्ध राणी), **निवेदिता**– (स्वामी विवेकानंदांची शिष्या), **सारदा** – (भगवान रामकृष्ण परमहंसांची लीला सहधर्मचारिणी)

**पौराणिक महापुरुष** –

[ १२ ] **श्रीराम, भरत, कृष्ण, भीष्म, धर्म, अर्जुन, मार्कंडेय, हरिश्चंद्र, प्रह्लाद, नारद, ध्रुव.**

[ १३ ] **हनुमान, जनक, व्यास, वसिष्ठ, शुक** (व्यास-पुत्र), **बळीराजा दधीची, विश्वकर्मा**–(संपूर्ण कला व शिल्प शास्त्रांचे गुरु), **पृथू**–(विविध प्रकारली धान्ये, खनिजे, रत्नांचा संशोधक), **वाल्मिकी**–(रामायण रचयिता), **भार्गव** – परशुराम.

[ १४ ] **भगीरथ**–(स्वर्गवाहिनी गंगानदी पृथ्वीवर आणली), **एकलव्य** (गुरुभक्तीचा अपूर्व आदर्श), **मनू** (धर्मनियमांचे प्रवर्तन करणारा), **धनन्वरी** – (१) देवांचा वैद्य, (२)अष्टांग आयुर्वेदाचे प्रवर्तक. **शिबी राजा** (आश्रयार्थी कबुतराचे प्राण वाचविण्यासाठी स्वशरीरही देण्याची तयारी), **राजा रन्तिदेव**–(सर्वस्व-दानाचे प्रतीक).

**संत, संप्रदायप्रवर्तक, कलोपासक**

[१५] **सर्व बुद्ध, सर्व जिनेंद्र** (तीर्थंकर), **गोरक्ष** (गोरखनाथ), **पाणिनी** (जगातील श्रेष्ठ भाषाशास्त्रज्ञ, संस्कृत व्याकरणाचे शास्त्रकार), **पतंजली** (योगसूत्राचे लेखक, व्याकरणाचे भाष्यकार, पुष्यमित्राचे मार्गदर्शक) **शंकराचार्य, मध्वाचार्य, निंबार्काचार्य** (वैष्णवदार्शनिक संत, निबार्क संप्रदायाचे सस्थापक), **श्रीरामानुज** – (विशिष्टाद्वैत सिद्धांतवादी, अस्पृश्यता – निवारक), **श्रीवल्लभ**–पुष्टिमार्ग प्रवर्तक.

[ १६ ] **झूलेलाल** ('उडेरोलाल' या नावानेही प्रसिद्ध. सिंध प्रांतातील १० व्या शतकातील वंद्य पुरुष, हिंदूवरील सामुदायिक धर्मांतराचे संकट निवारले), **चैतन्य** (गौरांग महाप्रभू – वंग प्रांतीय कृष्णभक्त), **तिरुवल्लुवर** ('तिरुक्कुरळ' नावाच्या सुभाषितसंग्रहाच्या तामिळी ग्रंथाचा रचयिता), **नायन्मार** (मध्ययुगीन दाक्षिणात्य ६० शैव संतपुरुष), **आलवार** (मध्ययुगीन दाक्षिणात्य १२ वैष्णव संतजन), **कंब** (तामिळ भाषेचे 'वाल्मिकी'); **बसवेश्वर**–(वीरशैव संप्रदायाचे संस्थापक).

[१७] **देवल ऋषी** ('देवल-स्मृती' लेखक. धर्मान्तरित लोकांचे परिवर्तन करावयाच्या विधीचा समयोचित पुरस्कार केला), **रविदास** (रोहिदास अथवा रैदास या नावांनीही प्रसिद्ध. १६ व्या शतकातील चर्मकार समाजातील श्रेष्ठ संत. स्वामी रामानंदांचे शिष्य), **कबीर, गुरु नानक, नरसी मेहता, तुलसीदास, दशमेश** (दहावे गुरु गोविंदसिंह).

[ १८ ] **शंकर देव**– आसामातील भागवत धर्माचे प्रचारक. भागवताचे सार सांगणारा 'गुणमाला' ग्रंथ लिहिला. **सायण – माधव** – शास्त्रज्ञ बंधू. वेद, उपनिषदे, गीता, पंचदशी इत्यादी ग्रंथांवर भाष्ये लिहिली. प्रगाढ पांडित्याबरोवर पराक्रमही असल्याने दोघांचे कार्य अनोखे होते.

**ज्ञानेश्वर-तुकाराम** – महाराष्ट्रीय संतश्रेष्ठ, **रामदास** – (१) शिखांचे चौथे गुरु, (२) रामदास स्वामी. **पुरंदरदास** –कर्नाटक प्रांताचे 'तुकाराम'.

[ १९ ] **बिरसा मुंडा**–दक्षिण बिहार आणि त्याशी संलग्न असलेल्या ओरिसा आणि मध्यप्रदेश यामधील वनवासी प्रदेशातील जनतेला संघटित करून इंग्रजांविरूद्ध उठाव केला; रांची येथील तुरुंगात मृत्यू. **स्वामी सहजानंद**–स्वामी नारायण, उद्धव संप्रदायाचे संस्थापक. **रामानंद**–लोकाभिमुख धर्माचा प्रचार केला. निकृष्ट मानल्या जाणाऱ्या जातीतील कबीर, रैदास, सेना न्हावी, पद्मावती आदींचा शिष्य-परिवार,

[ २० ] **भरत ऋषी** – नृत्य, नाट्य, संगीत वगैरे भारतीय कलांचे आदिगुरु. **कालिदास** – कवि कुलगुरु, संस्कृतचे साहित्यकार; **राजा भोज**– मध्य भारताचे प्रतापी सम्राट. शिल्प, साहित्य, ज्योतिष, योग, संगीत; इत्यादीविषयक अनेक ग्रंथांचे लेखक; **जकणाचार्य**– कर्नाटकातील हळेबीड, बेलूर, वगैरे जगप्रसिद्ध मंदिरांचे शिल्पकार; **सूरदास**–कृष्णभक्त, **त्यागराज**–कर्नाटक संगीताचे गायक. 'धनराज पंचरत्न' भजन संग्रह प्रसिद्ध आहे. **रसखान**–कृष्णभक्त पठाण मूळ नाव सैय्यद इब्राहीम. 'सुजान रसखान' आणि 'प्रेमवाटिका' नावाचे दोन काव्यसंग्रह.

[ २१ ] **राजा रविवर्मा** – कलांच्या विविध अंगांचे सुंदर एकत्रीकरण तैलरंगात व्यवस्थितरीत्या चितारणारा श्रेष्ठ कलावंत, **गोविंदराव भातखंडे**– आधुनिक काळातील भारतीय संगीत शास्त्राचे जगन्मान्य उद्धारक. **राजा भाग्यचंद्र**–मणिपुरी ललितकलांचा आश्रयदाता राजा. भारतीय संस्कृतीच्या प्रचारकार्यात फार मोठे योगदान.

**प्रसिद्ध वीर –**

[ २२ ] **अगस्त्य**–अगस्ती ऋषी; **कम्बू, कौंडिन्य, राजेंद्र चोल**–भारतीय संस्कृतीची ध्वजा भारताबाहेर फडकविणारे श्रेष्ठ पुरुष. **अशोक** – बौद्ध-मताचा प्रचारक–सम्राट, **पुष्यमित्र**– ग्रीक–आक्रमणाचा प्रतिकार करणारा हिंदू सम्राट. शुंग वंशाचा संस्थापक. **खारवेल**–कलिंगचा चक्रवर्ती राजा."

[२३] **चाणक्य–चंद्रगुप्त** (या गुरु-शिष्यांनी शिकंदराचे आक्रमण रोखले) **विक्रम, शालिवाहन, समुद्रगुप्त, श्रीहर्ष** –चक्रवर्ती राजे; **शैलेन्द्र-बाप्पा रावळ**– (भारताबाहेर भारतीय संस्कृतीची ध्वजा फडकविणारे वीर).

[२४] **लाचित बडफुकन**–आसाममधील अहोम राज्याचा प्रतापी रण-नीतिकुशल सेनापती. **भास्कर वर्मा** – मध्ययुगीन आसामचा सर्वश्रेष्ठ राजा. **यशोधर्मा** – हूण आक्रमकांना जिकणारा **श्रीकृष्णदेवराय** – विजयानगर साम्राज्याचा राजा, **ललितादित्य**–आठव्या शतकातील परकीय आक्रमकांचा समाचार घेणारा काश्मिरचा प्रतापी राजा.

[ २५ ] **मसुनूरि नायकद्वय**–वरंगळ येथील काकतीय राजा प्रतापरुद्र यांचे सेनापती प्रोलय नायक व त्याचा भाचा कप्पय नायक चौदाव्या शतकात दक्षिणेवर झालेल्या मुसलमानी आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार करणारे मसुनूरी गावचे मामा–भाचे. **प्रताप** – महाराणा प्रतापसिंह, **शिवभूपती**– हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, **रणजितसिंह** – पंजाब प्रांतात प्रतापी खालसा साम्राज्याजी स्थापना करून ४० वर्षे राज्य केले.

**वैज्ञानिक –**

[ २६ ] **कपिल** – आदिसिद्ध सांख्य दर्शनाचे प्रवर्तक, **कणाद** –वैशेषिक दर्शनाचे प्रवर्तक. परमाणुवादाचे आद्य प्रतिपादक. **सुश्रुत** – शल्यतंत्र-पारंगत आयुर्वेदाचार्य. त्वचारोपण तंत्र (प्लॅस्टिक सर्जरी) व डोळ्यातील मोती-बिंदूची शस्त्रक्रिया (कॅटरॅक्ट ऑपरेशन) यांचा विकास केला, **चरक** –प्रसिद्ध प्रमाणभूत 'चरक संहिता' ग्रंथाचे लेखक' जगातील अनेक भाषांत या ग्रंथाची भाषांतरे झाली. कनिष्क राजाचे राजवैद्य. **भास्कराचार्य** –१२ व्या शतका-तील महाराष्ट्रीय श्रेष्ठ गणितज्ञ, 'सिद्धांत शिरोमणी' ग्रंथाचे लेखक. विख्यात ज्योतिषी **वराहमिहिर** –महान ज्योतिषाचार्य 'वराहमिहिर संहिता' नावाचा ज्योतिषशास्त्रावरील अपूर्व ग्रंथ लिहिला

[ २७ ] **नागार्जुन**–आंध्रनिवासी प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ, **भरद्वाज**– सूक्त द्रष्टा वैदिक ऋषी; **आर्यभट्ट** – गणितज्ञ व ज्योतिर्विद. चौथे शतक. ८ व्या शतकात याच नावाचा आणखी एक प्रख्यात गणितज्ञ होऊन गेला. **जग-दीशचंद्र बोस** –वनस्पतींना प्राण असल्याचे आधुनिक उपकरणांनी सिद्ध केले. मारकोनी या शास्त्रज्ञाच्या अगोदर बिनतारी संदेश प्रक्षेपणाचा (वायरलेस कम्युनिकेशन) शोध लावला होता, परंतु पारतंत्र्यामुळे त्या श्रेयापासून वंचित. **चंद्रशेखर व्यंकटरामन** – नोबेल पारितोषिक विजेता शास्त्रज्ञ. प्रकाशकिरणांवर रमण प्रभाव नावाच्या होणाऱ्या प्रक्रियेचा शोधक. **रामानुज** – तामिळनाडू प्रांतातील आधुनिक काळातील गणितज्ञ.

आधुनिक महापुरुष –

[ २८ ] **रामकृष्ण परमहंस, दयानंद सरस्वती, रवीन्द्रनाथ टागोर, राममोहन रॉय, रामतीर्थ, अरविंद घोष, विवेकानंद.**

[ २९ ] **दादाभाई नौरोजी** पारशी समाज–सुधारक, काँग्रेस-संस्थापकांपैकी एक. **गोपबंधूदास** – ओरिसा प्रांतातील दीनदुबळ्यांचा साह्यकर्ता. **लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, रमण महर्षी, पं. मदनमोहन मालवीय, सुब्रह्मण्य भारती** – तामिळ साहित्यिक कवी.

[ ३० ] **नेताजी सुभाषचंद्र बोस, प्रणवानन्द**–भारत सेवाश्रम संघ या संस्थेचे संस्थापक; 'मिलन मंदिर' नावाने दैनिक एकत्रीकरणाद्वारे हिंदू संघटनेचा प्रयत्न. मुख्यत: बंगालमध्ये. **स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, ठक्कर बाप्पा**–वनवासीय बंधूंच्या उन्नतीसाठी झटलेले सेवाव्रती. **डॉ. भीमराव आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, नारायणगुरु** – केरळ प्रांतातील सामाजिक कार्यकर्ते

[ ३१ ] परम पूजनीय आद्य सरसंघचालक **डॉ. के. ब. हेडगेवार** द्वितीय सरसंघचालक श्री. **मा. स. गोळवलकर** तथा **श्रीगुरुजी**

●

# एकात्मता-मंत्र

यं वैदिका मन्त्रदृशः पुराणा
इन्द्रं यमं मातरिश्वानमाहुः ।
वेदान्तिनोऽनिर्वचनीयमेकं
यं ब्रह्मशब्देन विनिर्दिशन्ति ॥ १ ॥

शैवा यमीशं शिव इत्यवोचन्
यं वैष्णवा विष्णुरिति स्तुवन्ति ।
बुद्धस्तथाऽर्हन्निति बौद्धजैनाः
सत्-श्री-अकालेति च सिक्ख सन्तः ॥ २ ॥

शास्तेति केचित् कतिचित् कुमारः
स्वामीति मातेति पितेति भक्त्या :
यं प्रार्थयन्ते जगदीशितारं
स एक एव प्रभुरद्वितीयः ॥ ३ ॥

**भावार्थ –**

प्राचीन कालच्या मंत्रद्रष्टया ऋषींनी ज्यास इंद्र, यम, मातरिश्वान म्हणून संबोधले; ज्या एका अनिर्वचनीयांस वेदान्ती ब्रह्म या शब्दाने संबोधतात; शैव, ज्यास शिव आणि वैष्णव ज्यास विष्णू संबोधून स्तुती करतात, बौद्ध आणि जैन ज्यास बुद्ध आणि अर्हन् संबोधितात आणि शीख सन्त ज्यास 'सत्श्री अकाल' या नावाने ओळखतात; ज्या जगन्नियंत्यास कोणी शास्ता तर कोणी कुमारस्वामी म्हणतात; इतकेच नव्हे तर स्वामी, माता, पिता, इत्यादि संबोधने लावून ज्यांची कोणी भक्तिपूर्वक प्रार्थना करतात, तो परमात्मा एकच आहे आणि अद्वितीय आहे. अर्थात त्याची तुलना करताच येत नाहीं !

●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
श्री. अरुण दिघे यांनी भेट दिलेले पुस्तक.

# प्रार्थना

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम् ।
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ॥ १ ॥

प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरं त्वां नमामो वयं ।
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं
शुभामाशिषं देहि तत्पूर्तये ॥
अजय्यां च विश्वस्य देहीश शक्ति
सुशीलं जगद्येन नम्रं भवेत् ।
श्रुतं चैव यत्कण्टकाकीर्णमार्गं
स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत् ॥ २ ॥

समुत्कर्षनिःश्रेयसस्यैकमुग्रं
परं साधनं नाम वीरव्रतं ।
तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा
हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् ॥
विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर्
विधायास्य धर्मस्य संरक्षणं ।
परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रं
समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ॥ ३ ॥

॥ भारत-माता की जय ॥

**प्रार्थना म्हणताना**

परसवर्णानुसार पुढीलप्रमाणे उच्चारण करावे :—

१. सुखं वर्धितोऽहम् = सुखँव् वर्धितोऽहम्

२. इमे सादरं त्वां = इमे सादरन् त्वान्
शुभामाशिषं देहि = शुभामाशिषन् देहि
अजय्यां च = अजय्याञ् च
सुशीलं जगद्येन = सुशीलञ् जगद्येन
श्रुतं चैव = श्रुतञ् चैव
स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत् = स्वयम् स्वीकृतन् नस् सुगङ कारयेत

३. समुत्कर्षनिःश्रेयसस्यैकमुग्रं = समुत्कर्षनिश्श्रेयसस्यैकमुग्रम्
परं साधनं नाम वीरव्रतं = परम् साधनम् नाम वीरव्रतम्
तदन्तः स्फुरत्वक्षया = तदन्तस् स्फुरत्वक्षया
विजेत्री च नः = विजेती च नस्
परं वैभवं = परवँ वैभवन्

## प्रार्थनेचा अर्थ

हे वत्सल मातृभूमे, मी तुला सदैव नमस्कार करतो. हे हिंदुभूमे, तू माझे सुखाने पालनपोषण केलेले आहेस. हे महामंगलमयी पुण्यभूमे, तुझ्यासाठी माझा हा देह समर्पण होवो. मी तुला पुन:पुन्हा वंदन करतो.

हे सर्वशक्तिमान परमेश्वरा, हिंदुराष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर प्रणाम करतो. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध झालो आहोत. त्या कार्याच्या पूर्ततेसाठी आम्हाला तू शुभाशीर्वाद दे. हे प्रभू, आम्हाला अशी शक्ती दे की, जिला आव्हान देण्याचे धैर्य जगातील अन्य कुणा शक्तीला व्हावयाचे नाही. असे शुद्ध चारित्र्य दे की, ज्या चारित्र्यामुळे संपूर्ण विश्व नतमस्तक होईल. आणि असे ज्ञान दे की, ज्यामुळे आम्ही स्वत: होऊन पत्करलेला हा काटयाकुटयांनी भरलेला मार्ग सुगम होईल.

उच्च असे आध्यात्मिक सुख आणि महानतम अशी ऐहिक समृद्धी प्राप्त करण्याचे एकमेव श्रेष्ठतम असे साधन असलेली उग्र अशा वीरव्रताची

भावना आमच्यांत सदैव उत्स्फूर्त होत राहो. तीव्र आणि अखंड अशी ध्येयनिष्ठा आमच्या अंतकरणांत सदैव जागती राहो. तुझ्या कृपेने आमची ही विजयशालिनी संघटित कार्यशक्ती आमच्या धर्माचे संरक्षण करून या राष्ट्राला वैभवाच्या उच्चतम शिखरावर पोहोचविण्यास समर्थ होवो.

भारत माता की जय

•

## प्रार्थनेचा अन्वय आणि अर्थ

**वत्सले मातृभूमे** — (हे) प्रेमळ मातृभूमे
**ते** — तुला
**सदा** — नेहमी
**नमः** — नमस्कार करतो.
**हिन्दुभूमे** — (हे) हिंदुभूमे
**त्वया** — तुझ्याकडून
**अहम्** — मी
**सुखम्** — सुखाने
**वर्धितः** — वाढविला गेलो आहे.
**महामङ्गले पुण्यभूमे** — (हे) परममंगलमय पुण्यभूमे
**त्वदर्थे** — तुझ्यासाठी
**एषः कायः** — हे शरीर
**पततु** — समर्पण होवो.
**नमस्ते नमस्ते** — तुला अनेकवार नमस्कार
**शक्तिमन् प्रभो** — (हे) सर्वशक्तिमान परमेश्वरा
**हिन्दुराष्ट्राङ्गभूताः** — हिंदुराष्ट्राचे घटक (पुत्र)
**इमे** — हे
**वयम्** — आम्ही
**त्वाम्** — तुला
**सादरम्** — आदराने
**नमामः** — प्रणाम करतो
**त्वदीयाय** — तुझ्याच
**कार्याय** — कार्यासाठी
**इयं** — ही
**कटी** — कमर
**बद्धा** — बांधली आहे.
**तत्पूर्तये**—त्याच्या (त्या कार्याच्या) पूर्ततेसाठी
**शुभां आशिषम्**— शुभ आशीर्वाद
**देहि** — दे
**ईश** — (हे) परमेश्वरा
**विश्वस्य** — (सर्व) जगाला
**अजय्यां** — जिला कोणीही जिंकू शकणार नाही अशी
**शक्ति** — शक्ती
**देहि** — दे
**येन** — ज्यामुळे

**जगद्** — जग
**नम्रं** — नम्र
**भवेत्** — होईल
**सुशीलं** — (असे) शुद्ध चारित्र्य
**यत्** — जे
**स्वयं स्वीकृतं** — स्वत: होऊन पत्करलेला
**नः** —आमचा
**कण्टकाकीर्णमार्गम्** — काटया-कुटयांनी भरलेला मार्ग (कण्टक + आकीर्ण + मार्गम्)
**सुगं** — सोपा
**कारयेत** — केला जाईल
**श्रुतं** — (असे) ज्ञान
**चैव** — सुद्धा (च + एव)
**देहि** — दे
**समुत्कर्षनिश्रेयसस्य** —ऐहिक आणि पारलौकिक कल्याण (समुत्कर्ष + निश्रेयसस्य)
**एकं परं उग्रं साधनम्** — एकमेव श्रेष्ठतम उग्र साधन
**वीरव्रतं नाम** — (ज्याला) वीरव्रत (असे) नाव (आहे)
**तदन्तः स्फुरतु**— त्याचे अंत:करणात स्फुरण होवो ( तत् + अन्त:)
**अक्षया** — (कधीहि) क्षीण न होणारी
**तीव्रा** — तीव्र (स्फुरत्वक्षया = स्फुरतु + अक्षया)
**ध्येयनिष्ठा**—ध्येयाविषयीची निष्ठा
**अनिशम्** — नेहमी (अहोरात्र)
**हृदन्तः** — हृदयामध्ये
**प्रजागर्तु** — जागती राहो
**विजेत्री** — विजयशाली
**च** — आणि
**नः** – आमची
**संहता कार्यशक्तिः** — संघटित कार्यशक्ती
**अस्य धर्मस्य** — या (आमच्या) धर्माचे
**संरक्षणम्** — संरक्षण
**विधाय** — करुन
**एतत्** — या
**स्वराष्ट्रं** — आमच्या राष्ट्राला
**परं वैभवं** — उच्चतम वैभव (शिखरावर)
**नेतुं** — पोहोचविण्यासाठी
**ते आशिषा** — तुझ्या आशीर्वादाने
**भृशं** — अतीव
**समर्था भवतु** — समर्थ होवो
भवत्वाशिषा = भवतु + आशिषा

भारत माता की जय !

●

## भोजनप्रसंगी म्हणावयाचे श्लोक

१ यन्तु नदयो वर्षन्तु पर्जन्याः। सुपिप्पला ओषधयो भवन्तु ।
अन्नवताम् ओदनवताम् आमिक्षवतान् एषाँ राजा भूयासम् ॥
ओदनम् उद्ब्रुवते । परमेष्ठी वा एषः यदोदनः ।
परमाम् एवैनँ श्रियं गमयति ॥

२ मा भ्राता भ्रातरं द्विक्षन्, मा स्वसारमृत स्वसा ।
सम्यञ्चः सव्रता भूत्वा, वाचं वदत भद्रया ॥

३ ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥

४ सह नाववतु सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥
ॐ शान्तिः शान्ति शान्तिः ।

### अर्थ

(१) नद्या वाहोत, पाऊस पडो. वनस्पती सफल होवोत. अन्न, शिजलेला भात व दूधदुभते यांनी युक्त असलेल्या या (प्रदेशांचा) मी स्वामी व्हावे. (लोक) शिजलेल्या भाताची स्तुती करतात. हा भात परमश्रेष्ठ आहे. तो याला श्रेष्ठ कल्याणाबाबत घेऊन जावो.

(२) भावाने भावाचा, तसेच बहिणीने बहिणीचा द्वेष करू नये. एकरूप होऊन व व्रतस्थ राहून मंगल वाणीने शब्दोच्चार करा.

(३) समर्पण हे ब्रह्म आहे. हविर्द्रव्य ब्रह्म आहे. ब्रह्मरूपी अग्नीत ब्रह्माच्या साहाय्याने त्याचे हवन केले आहे. एकाग्रतेने केलेल्या ब्रह्मरूपी त्या कर्माने ब्रह्मपदालाच जायचे आहे


(४) (हे ब्रह्म) आम्हां दोघांवर कृपा करो. आम्हां दोघांचे रक्षण करो, आम्ही दोघे पराक्रम करू. आम्हा दोघांचे अध्ययन तेजस्वी असो. आम्ही (एकमेकांचा) द्वेष करू नये

●

# सूर्य-नमस्कार मन्त्र

ॐमित्राय नमः ।
ॐरवये नमः ।
ॐसूर्याय नमः ।
ॐभानवे नमः ।
ॐखगाय नमः ।
ॐपूष्णे नमः ।
ॐहिरण्यगर्भाय नमः ।
ॐमरीचये नमः ।
ॐआदित्याय नमः ।
ॐसवित्रे नमः ।
ॐअर्काय नमः ।
ॐभास्कराय नमः ।

ॐश्रीसवितृसूर्यनारायणाय नमः ।



म. ग्रं. सं. ठाणे, बालवाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. क्र. 3099 दिनांक 28/10/13
विषय 07.01.